पुण्य नगरी
गुरुवार, ४ ऑक्टोबर २०१८ पुणे

# स्वछ्ता अभियान

पुणे : पंख व क्विकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण प्रकल्पांतर्गत, रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू विद्यालय मुलींची व मुलांची शाळा यांच्या सहकार्याने, विद्यार्थ्यांमार्फत म्हणजेच फ्लायिंग यंगस्टर्स गटामार्फत मारुती मंदिर परिसर, वडारवाडीत स्वच्छतेचा कार्यक्रम झाला.

यावेळी महापौर मुक्ता टिळक, क्विकहिल फाउंडेशन डायरेक्टर कैलास काटकर, अनुपमा काटकर, नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, सिद्धार्थ शिरोळे, सिद्धेश्वर झाडबुके, अजय शिर्के, स्मिता आपटे, कल्याणी भावड, मैथिली बंडी, राम म्हेत्रे, उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन कौस्तुभ जोगळेकर व श्वेता सूर्यवंशी यांनी केले.